नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २९/०३/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक २४/०४/२०१७ चे १९.५३ वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजु कचरूजी रनविर(तहसिलदार) तर्फे शांताराम माधवराव ठाकरे (नायब तहसिलदार सावनेर) यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. १४०/२०१७ कलम ३५३, ५०४, १८६ भादवी सहकलम ८५ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २४/०४/२०१७ चे १५.४५ वा. दरम्यान फिर्यादी तहसिलदार हे आपल्या कार्यालयात कार्यालयीन कामकाज करीत असतांना आरोपी नामे– अनिल शामराव चोरे, वय ४५ वर्ष, रा. डोरली अजनी तह. सावनेर जि. नागपूर हा दारू पीवून आल्याने त्यास बाहेर जान्यास सांगितले वरून आरोपीने टेबल वरील कागदपत्र फेकुन शासकीय कागदपत्र, नेमप्लेट, मोबाईल फेकुन शासकीय कामकाजात अळथळा निर्माण केला. आरोपीला दिनांक ०५/०५/२०१७ चे १३.५८ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस हवालदार श्री. प्रमोद गदरे पो.स्टे. सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २९/०३/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. पी.एफ.सैय्यद, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५३, ५०४, १८६ भादंवि. मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/–रु. दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. ठाकरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, श्री. वियज कुमेरीया यांनी मदत केली आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील मौजा चिखली येथे दिनांक २५/०३/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान **विनोद चंद्रभान पाटील (मृतक), वय ४४ वर्ष, रा. चिखली ता. कामठी** हा गेल्या ८ दिवसा पासून दारु पिवुन दारुच्या नशेत त्याने किटकनाशक विषारी औषध प्राशन केली. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकामी प्राथमिक आरोग्य केंद्र भूगाव नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे दि. २५/०३/२०२२ चे ०७.३३ वा. भरती केले असता डॉ. तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे, मेयो पोलीस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार देवीदास पवार मो.क्र. ९८२३०३७२७९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कुही :— अंतर्गत २७ कि.मी. अंतरावरील मौजा सालईमेंढा, ता. उमरेड जि. नागपूर येथे दिनांक २६/०३/२०२२ चे १८.४५ वा. दरम्यान **रिहान सचिन भोयर (मृतक), वय १५ महीने, रा. सालईमेंढा** याने उवा मारण्याची विषरी औषध सेवन केली. त्याची प्रकृत्ती खराब झाल्याने त्यास प्राथमीक उपचार करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे २४/०३/२०२२ रोजी भरती केले असता उपचार दरम्यान दि. २६/०३/२०२२ चे ०१.४५ वा. डॉक्टरांनी मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सचिन बिसन भोयर, वय २५ वर्ष, सालईमेंढा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप लांजेवार मो.नं. ९८८१०९३५२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**